Pravarsen Shikshan Sanstha, Nagpur

Dr. L. D. Balkhande College of Arts & Commerce, Pauni Dist. Bhandara, Maharashtra

Gondia Education Society's

Smt. Rewaben Manoharbhai Patel Mahila Kala Mahavidyalaya, Bhandara, Maharashtra

- Jointly Organised by Department of Library -

# One Day National e-Workshop

- ON -

## Basics of Intellectual Property Rights (IPR) & Plagiarism in Academics

**Date & Time : August 28 - 2020, Friday-Morning at 11:00 a.m.**

Scanned by CamScanner



**Shri Milind L. Balkhande**
(Secretary)
Pravarsen Shikshan Sanstha, Nagpur.

**Valedictory Function**

- Time -
02:15 p.m.



**Dr. Anil Kosamkar**
(Officiating Principal)
Dr. L. D. Balkhande College of Arts & Commerce, Pauni, Bhandara.

## Join One Day National e-Workshop Using Free Registration Link

https://forms.gle/biQPLAfvvcTaRufM8

**After Registration, Please Join Telegram Group**

https://t.me/joinchat/Q9tUrxSYWdMGr9ndlCW7Ww


**Best Regards**


**Shri. Nandkishor Singade**
(Vice Principal)
Dr. L. D. Balkhande College of Arts & Commerce, Pauni, Bhandara.
+91 9422956365


**Dr. Swati Shambharkar**
(Librarian)
Dr. L. D. Balkhande College of Arts & Commerce, Pauni, Bhandara.
+91 8379886034


**Ku. Varsha Meshram**
(Librarian)
Smt. Rewaben Manoharbhai Patel Mahila Kala Mahavidyalaya, Bhandara.
+91 8862011984


Scanned by CamScanner




Scanned by CamScanner
Scanned by CamScanner






Scanned by CamScanner

# अहवाल

प्राचार्य,

डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट

ॲण्ड कॉमर्स पवनी, जिल्हा भंडारा.

विषय :— **डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, पवनी व श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने ''बौद्धीक संपदा अधिकाराची मूलभूत माहिती आणि शैक्षणिक वाङ:मयचौर्य'' या विषयावर दिनांक २८/०८/२०२० एक दिवसीय राष्ट्रीय ई—कार्यशाळा चा अहवाल** ........

मा. महोदय,

डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, पवनी व श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा यांच्या संयुक्त विद्यमाने ''बौद्धीक संपदा अधिकाराची मूलभूत माहिती आणि शैक्षणिक वाङ:मयचौर्य'' या विषयावर दिनांक २८/०८/२०२० ला एक दिवसीय राष्ट्रीय ई—कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या ई—कार्यशाळेचे उदघाटन, उदघाटक मा. डॉ. दत्तात्रय देशपांडे माजी प्राचार्य, अग्निहोत्री कॉलेज ग्रंथालय व माहितीशास्त्र, वर्धा व उद्घाटनीय ई—कार्यशाळेचे अध्यक्ष मा. डॉ. दीपा बलखंडे, अध्यक्ष, प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर यांच्या शुभहस्ते पार पडले.

या ई—कार्यशाळेचे अध्यक्ष मा. डॉ. दीपा बलखंडे, अध्यक्ष, प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर यांनी अध्यक्षिय मनोगत व्यक्त करतांना सांगीतले की, प्रतिभा ही अलौकिक शक्ती आहे. ही शक्ती लाखात एखादयालाच प्राप्त होते. प्रतिभा शक्तीमुळे नावीन्याचा शोध घेवून समाजाला नित्य नवे विचार देण्याचा प्रयत्न करता येतो. असे मत व्यक्त केले. या ई—कार्यशाळेचे उदघाटक मा. डॉ. दत्तात्रय देशपांडे यांनी उदघाटनीय मनोगतातून सांगीतले की, २१ वे शतक ज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. ज्ञानावर प्रक्रिया करून त्याचे संपत्ती मध्ये रूपांतर करणे हे सर्वात महत्वाचे कार्य आहे असे मत व्यक्त केले.

या ई—कार्यशाळा पहिल्या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक मा. डॉ. सुनिल सतपती, डेप्युटीग्रंथपाल, विभागप्रमुख सेंट्रल लायब्ररी नॅशनल इन्स्टीटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, रायपूर यांनी बौद्धीक संपदा अधिकाराची मुलभूत माहिती : एक परिदृश्य या विषयावर मार्गदर्शन करतांना सांगीतले की, बौद्धीक संपदा अधिकाराचे तीन स्तर आहे. तसेच बौद्धीक क्षमता व वाङ:मय या विषयी संपूर्ण सार सांगितले.

दुस—या सत्रामध्ये मा. डॉ. सुरेश जंगे, विद्यापीठ ग्रंथालय, गुलबर्गा विद्यापीठ, कलाबुर्गी, कर्नाटक यांनी बौद्धीक संपदा अधिकाराची मुलभूत माहिती : ग्रंथावरील हक्क या विषयावर मार्गदर्शन करतांना सांगीतले की, नॅक मध्ये ३.३ च्या निकषा मध्ये बौद्धीक संपदा अधिकाराचे महत्व आहे. तसेच ग्रंथावरचा हक्क या विषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले. तृतीय सत्रामध्ये मा. डॉ. नंदकुमार दहिभाते, माजी प्राचार्य, नॅशनल केमीकल लेबॉरेटरी सी.एस.आय. आर., पुणे यांनी बौद्धीक संपदा अधिकाराची मुलभूत माहिती : स्पष्टता व अनेक पैलू या विषयावर मार्गदर्शन करतांना सांगितले की, बौद्धीक संपदेचे अधिकार कोण आणि कशापद्धतीने वापरू शकतो या विषयी मार्गदर्शन केले.

चौथ्या सत्रामध्ये मा. डॉ. दीपक कापडे, विद्यापीठ ग्रंथालय, कवीकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक यांनी वाङ:मयचौर्य : प्रत्यक्ष दृष्टीकोन या विषयावर मार्गदर्शन करतांना सांगितले की, प्रायोगिक तत्वावर वाङ:मय कशे तपासायचे. ते तपासायची संगणकिय यंत्रणा आहे. त्यानूसार ते चोरले गेले आहे का? ते कळते. असे मत व्यक्त केले.

Scanned by CamScanner

या राष्ट्रीय ई–कार्यशाळेच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. मिलिंद बलखंडे, सचिव, प्रवरसेन शिक्षण संस्था, नागपूर हे होते. समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्षिय मनोगत व्यक्त करतांना सांगीतले की, कुणीही शिक्षणापासून वंचित राहू नये. सर्वांनीच शिक्षणात प्रगती करावी व भारताला आत्मनिर्भर बनवावे असे मत व्यक्त केले. तसेच प्रमुख अतिथी मा. डॉ. अनिल कोसमकर, प्रभारी प्राचार्य, डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट अँण्ड कॉमर्स, पवनी यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, लेखन कार्याची चोरी केली तर त्यासाठी कडक कायदे केलेले आहेत. साहित्य हे स्वनिर्मित असायला पाहिजे. असे मत व्यक्त केले.

या एकदिवसीय ई–कार्यशाळेचे सुत्रसंचालन मा. डॉ. श्वेता वेगड, श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय मा. कु. वर्षा मेश्राम, ग्रंथपाल, श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा यांनी करून दिला तर आभार मा. डॉ. कु. स्वाती शंभरकर, ग्रंथपाल, डॉ. एल. डी. बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट अँण्ड कॉमर्स, पवनी यांनी मानले. या कार्यशाळेच्या यशस्वीतेकरीता दोन्ही महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

दिनांक :– २/०९/२०२०
पवनी.

समन्वयक

(डॉ. स्वाती वी. शंभरकर)
ग्रंथपाल

Scanned by CamScanner